**डॉ. बी.यु. जाधव** हे म. शि. प्र. मंडळाच्या श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे २०१० पासून प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी याच संस्थेत वीस वर्षे भौतिकशास्त्राचे अध्यापन केले आहे. भौतिकशास्त्र आणि उच्च शिक्षणावर त्यांचे अनेक शोधनिबंध प्रकाशित आहेत. ते एक मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक आहेत. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या *उत्कृष्ट प्राचार्य* पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. ते एक प्रशिक्षित Assessor म्हणून NAAC शी संबंधित आहेत.

**डॉ. रोहिदास नितोंडे** हे म. शि. प्र. मंडळाच्या श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे इंग्रजी पदवी व पदव्युत्तर विभागा सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. इन सर्च ऑफ अ फेमिनिस्ट रायटर वरील मोनोग्राफसाठी ते ओळखले जातात. ते एक मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक आहेत. त्यांनी दोन लघु संशोधन प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. तसेच ते एक उत्तम अनुवादक आणि वक्ते म्हणूनही परिचित आहेत. २०११ पासून इंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेलचे (IQAC) समन्वयक म्हणूनही ते काम पाहत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांना मुख्य/निमंत्रित वक्ता म्हणून संबोधित केले आहे. ते 'भारतीय शिक्षा रत्न पुरस्कार' यासह अनेक पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत. ते UGC-STRIDE (घटक १) साठी प्रकल्प समन्वयक आहेत.

**डॉ. तुकाराम रामराव फिसफिसे** हे म. शि. प्र. मंडळाच्या श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १३ वर्षे पदवी आणि ११ वर्षे पदव्युत्तर स्तरावर अध्यापन केले आहे. तसेच त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय चर्चासत्र, परिषदा व कार्यशाळेत सहभागी होऊन आपल्या अभ्यासपूर्ण शोधनिबंधांचे वाचन केले आहे. आतापर्यंत त्यांचे विविध विषयांवरील ३० शोधनिबंध प्रकाशित आहेत.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

NEW MAN PUBLICATION
www.newmanpublication.com

ISBN 978-93-91621-05-6
₹ 395/-
9 789391 621056
www.newmanpublication.com

2021-22
①

# समकालीन भारतीय समाज
## समस्या आणि उपाय

:: संपादक ::

प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव
प्रा.डॉ. रोहिदास नितोंडे
प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे

146

१७. भारतातील काळा पैशाची कारणे आणि भ्रष्टाचार निर्मूलनासाठी शासकी...
प्रा. डॉ. रामेश्वर सोपानराव जाधव ११६
१८. बेकारीची समस्या
डॉ. उमेश्वर एम. मोरे १२१
१९. भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील सामाजिक आव्हाने
डॉ. प्रशांत प्रभाकरराव सराफ १२८
२०. नांदेड शहरातील उच्च शिक्षणावर कोविड १९ महामारीचा झालेला परीणाम ..
गणेश वामन पाटील १३५
२१. ताळेबंदी आणि शारीरिक शिक्षणाच्या समस्या
प्रा. डॉ. अमोलसिंह दशरथसिंह गौतम १४५
२२. प्रादेशिक विषमता – समस्या आणि उपाय
डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत १४९
२३. नांदेड जिल्ह्यातील राज्यशासकीय कुटूंब निवृत्तीवेतन धारकाच्या सामाजिक ...
वामन रामराव काकडे १५५
२४. आरक्षण व वास्तव स्थिती
प्रा. काळे टी.एफ. १६१
२५. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या
प्रा.डॉ. पांडुरंग किसनराव मगर १६४
२६. मराठवाडयाचे भाग्यविधाते : डॉ. शंकरराव चव्हाण
प्रा.साईचरण व्यंकटेश पेंडकर १६९
२७. दूरसंचार क्रांतीः ग्रामीण समस्या, विकास आणि परिवर्तन
प्रा. राजु बुरीले १७३
२८. सहकारी साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराचे मराठी कादंबरीत आलेले चित्रण
प्रा. विनायक जाधव १८२
२९. नागरिकांचे मुलभूत हक्क आणि सध्याची स्थिती
सहा. प्रा. डी. एन. रिठे १८७
३०. भारतातील बालकामगार कायदे आणि वास्तव
प्रा.डॉ.एस.जी. अन्सारी १९२
३१. काळया पैशाचे कायदेशीरकरण
प्रा.संदीप भानुदास गवते १९६
३२. पर्यावरण आणि सुरक्षा समस्या
डॉ. अरुण धोंडू वाळवी २०१
३३. काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था
प्रा. डॉ. रामदास मुकटे २०८

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



१.

## आर्यन खान : सामाजिक, राजकीय प्रसारमाध्यमविषयक प्रश्न आणि उपाय

**डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे,**
प्रोफेसर, वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद,
श्री शिवाजी महाविद्यालय,परभणी-४३१४०१

**प्रस्तावना :-**

प्रसिद्ध अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानला नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोने (एनसीबी) मुंबई-गोवा क्रूझवर ३ ऑक्टोंबर रोजी अटक केली. आर्यनकडे अंमली पदार्थ होते, असा एनसीबीने दावा केला. आर्यनच्या मोबाईलमधील चॅटिंगवरून त्याचे आंतरराष्ट्रीय ड्रग माफियांशी संबंध असल्याचे न्यायालयात सांगून एनसीबीने आर्यनला तुरूंगात डांबले. अनेक दिवस आर्यनला जामिन मिळाला नव्हता. दरम्यान, या अटक प्रकरणावरून अनेक आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन राजकीय पक्षात चांगलीच जूंपलेली आहे. महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक यांनी याबद्दल दररोज नवीन नवीन माहिती द्यायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही वेगवेगळे दावे सुरू केले आहेत. नवाब मलिक यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचे दावे दाखल झाले आहेत. हे प्रकरण कोणत्या वळणावर जाईल याबद्दल अंदाज वर्तविणे कठीण आहे. परंतु सर्वच प्रसारमाध्यमांनी या प्रकरणाला भरपूर प्रसिद्धी दिल्याने ते घराघरात जाऊन पोहोचले. ड्रग्ज, कोकेन, मार्फिन, आरएमडी, गांजा अशा अनेक आतापर्यंत माहित नसलेल्या अंमली पदार्थांची चर्चा, नवं तरुणांमध्ये सुरू झाली आहे. हे प्रकरण आता फक्त आर्यन शाहरुख खान पुरते मर्यादित राहिले नसून त्याने अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक, प्रसारमाध्यमविषयक, आरोग्यविषयक, भ्रष्टाचारविषयक, जीवनशैलीविषयक, नैतिकतेबद्दलचे प्रश्न निर्माण करून ठेवलेले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय आणि प्रसारमाध्यमविषयक प्रश्नांची चर्चा या संशोधन लेखामध्ये करण्याचा प्रयत्न आहे.

**संक्षिप्त शब्द :-**

१) एनसीबी : नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरा (अंमली पदार्थ नियंत्रण कक्ष)



147

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

३३.

# काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था

**प्रा. डॉ. रामदास मुकटे**
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये या विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यामध्ये एक प्रमुख समस्या म्हणून काळा पैशाकडे बघितले जाते. काळा पैसा कमी करणे हे एक आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आहे.भारतामध्ये मानवी चारित्र पेक्षा पैशाला अधिक महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते आणि त्यामुळे देशातील प्रत्येक व्यक्ती जास्तीत जास्त कशा पद्धतीने पैसे मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे.त्यातूनच भ्रष्टाचाराच्या, अवैध धंदे, चोरीच्या मार्गाने पैसे मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. यातून एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण होत आहे. सामाजिक,राजकीय आणि आर्थिकअशा सर्व क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण करण्यात येत आहे. अर्थव्यवस्थेत गरीब आणि श्रीमंत अशी दोन प्रमुख वर्गांची दरी या काळ या पैशांच्या निर्मितीमुळे झाल्याचे दिसून येते. एकूण विकासामध्ये एक अडचण म्हणून काळा पैशाकडे बघितले जात आहे.

भारतात काळा पैसा आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जेव्हा व्यक्ती भ्रष्टाचारा सारख्या अवैध मार्गाने संपत्ती पैसा कमवतो त्याला काळा पैसा असे म्हटले जाते. या पैशाची नोंद रीतसर पद्धतीने कोठेही केलेली नसते. रोख स्वरूपामध्ये पैसा बँक व्यतिरिक्त इतर ठिकाणी कुठे तरी ठेवला जातो. अशा मार्गाने मिळविलेल्या पैशाचा हे प्रभावी अस्तित्व भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये असल्याचे दिसून येते.

भारताच्या स्वातंत्र्य संदर्भात ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांनी विरोध केला होता त्यांचे म्हणणे असे होते की,'भारताला स्वातंत्र्य देऊ नका कारण भारतातील माणसे अत्यंत स्वार्थी आहेत सत्ता मिळाल्यानंतर ही माणसे भारताचे वाटोळे करतील जनतेला लुटतील प्रचंड भ्रष्टाचार करतील आणि स्वतः श्रीमंत होतील त्यातून देशाचा किंवा देशातील लोकांचा विकास होऊ शकणार नाही'. ही भविष्यवाणी घरी होताना आज दिसून येते.

चल्लीया समितीच्या अहवालानुसार १९८३-८४ एका आर्थिक वर्षात तब्बल ३६ हजार कोटी काळापैसा जमा झाला होता. यामध्ये शंभर कोटी







रुपयांचा परकीय व्यापारातील लाचखोरी, स्मगलिंग आणि परकीय व्यवहारासह अंमली पदार्थ व गुन्हेगारी व्यवहारातून निर्माण झाला. भारतात एक माजी केंद्रीय दक्षता आयुक्तांनी देशातल्या वाढत्या भ्रष्टाचाराबाबत टिप्पणी करताना म्हटले आहे की,' दर तीन भारतीय पैकी एक जण पूर्णतः भ्रष्टाचारी आहे भारतात भ्रष्टाचार शिष्टाचार झालेला आहे भारतातील सुमारे तीस टक्के लोक भ्रष्ट आहेत आणि साधारणपणे ५० टक्के लोक अर्ध भ्रष्टाचारी आहे तर उरलेले २० टक्के लोक हे आपले चारित्र्य टिकून आहेत'. हे भारतीय दक्षता आयोगाचे निवृत्त प्रत्यक्ष सिन्हा यांनी हे निरीक्षण केले.

| गैर व्यवहाराचे नाव | | रक्कम कोटी रु. |
|---|---|---|
| १. रामलिंग राजू (सत्यम कम्प्युटर्स) | - | ८००० |
| २. हर्षद मेहता (मुंबई शेअर बाजार) | - | ४००० |
| ३. केतन पारिख (शेअर्स). | - | १२५० |
| ४. सी.आर.भान्साळी | - | १२०० |
| ५.सोहील दया( कॉबलर) | - | १००० |
| ६.हिंदुजा बंधू (बोफोर्स) | - | ७.२ |
| ७.लालूप्रसाद यादव (चारा घोटाळा) | - | ९०० |
| ८.अब्दुल करिम तेलगी(बनावट मुद्रांक) | - | ३०००० |
| ९.सुरेश कलमाडी(राष्ट्रकुल स्पर्धा) | - | ७०००० |
| १०.ए-राजा (२ जी स्पेक्ट्रम) | - | १.७६ लाख |

संदर्भ - दैनिक सकाळ २ जानेवारी २०११

या उदाहरणावरून लक्षात येते की भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार व विविध मार्गाने काळा पैशांची निर्मिती मोठ्या प्रमाणात केली जाते. याचा प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर मोठा आहे. कळ्या पैशांच्या निर्मितीवर भारत सरकारने नियंत्रण ठेवणे काळाची गरज आहे अन्यथा काळा पैसा हे एक दहशतवादी आव्हाना सारखे आव्हान देशांतर्गत निर्माण होऊ शकते. या अहवालातून भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतातील काळा पैशामुळे देशामध्ये आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. याचे उदाहरण म्हणजे निवडणूक आयोगाकडून निवडणूक लढवण्यासाठी संपत्ती जाहीर करणे बंधनकारक असते त्यातून दर पाच वर्षांमध्ये राजकीय व्यक्तींची संपत्ती व ढण्याचे प्रमाण मोठे आहे.

जगात महासत्ता बनू पाहणाऱ्या भारतासाठी काळापैसा ही एक मोठी अडचण आहे. जवळपास १३१ कोटी लोकसंख्येच्या देशात आजही ६० टक्के जनते कडून केवळ मूलभूत गरजांची पूर्तता होत असताना दिसून येते.

Ghodkar
Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

तर जवळपास २१ टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगते. उर्वरित जनता मात्र श्रीमंती ऐशरामा मध्ये जीवन जगत आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैसा निर्मितीची कारणे**

१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री मध्ये मालमत्तेची किंमत कमी दाखवणे.
२. भारतीय कररचना सदोष आहे
३. सरकारचे अतिरिक्त कर चुकवेगिरी
५. वस्तू व सेवांची होणारी भाव वाढ
६. कर संक्रमण प्रक्रियेत अफरातफर करणे
७. एकाच व्यक्तीचे अनेक व्यवसाय असणे
८. रुपयाच्या घटत्या मूल्यामुळे विदेशी बँकेत डॉलरच्या रूपात पैसे साठवणे
९. वेतन मजुरी कमी असल्यामुळे इतर अवैध मार्गाने पैसा मिळवणे
११. भारतातील नोकरशाही पद्धत

**काळया पैशाचे परीणाम**

१. आर्थिक विषमता निर्माण होणे.
२. चैनीच्या वस्तूच्या उत्पादनात वाढ
३. अर्थव्यवस्थेत भाववाढीची समस्या निर्माण होणे
४. संपत्तीचे केंद्रीकरण.
५. राजसत्तेचे केंद्रीकरण
६. गुन्हेगारी मध्ये वाढ होणे
७. शासकीय उत्पन्नामध्ये घट होते
८. सोने-चांदी स्थावर मालमत्ता च्या किमती मध्ये वाढ होणे.
९. नैतिक मूल्यांचे अधःपतन होते.
१०.११. राष्ट्रीय साधनसामग्रीच्या गैरवापर मोठ्या प्रमाणात वाढते.

**काळा पैसा कमी करण्याचे उपाय**

१. करांचे दरामध्ये घट करावी
२. सक्षम प्रशासकीय यंत्रणा तयार करणे.
३. सार्वजनिक शेतक-यांच्या कार्यक्षमतेमध्ये सुधारणा घडून आणणे.
४. कर बुडणाऱ्या व्यक्तीवर कडक कारवाई करण्यात यावी.
५. कररचनेमधील पळवटा आहे बंद कराव्यात.
६. भ्रष्टाचार,काळा पैसा निर्मिती संदर्भात कायदा करून त्याची अंमलबजावणी कार्यक्षमपणे करणे.
७. संपत्तीवाढी संदर्भातील चौकशी करणे आणि गुन्हेगार आढळल्यास कारवाई करणे.





८. काळा पैसा पांढरा करण्यासाठी शुभेच्छा प्रकट योजना राबवणे.
९. चलनातील ५०० व २००० रू. नोटा बंद करणे
११. नोकर वर्गांच्या वेतनामध्ये वाढ करून त्यांना अनुषंगिक लाभ देणे.
१२. देशातील पैसा विदेशात जाणाऱ्या प्रक्रियेवर निर्बंध लावणे.

इत्यादी प्रमुख उपाय योजनांची अंमलबजावणी केली तर भारतातील काळा पैसाचे प्रमाण कमी होऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल.

**सारांश**

भारतीय अर्थव्यवस्थे समोर असलेल्या अनेक समस्या पैकी समांतर अर्थव्यवस्था किंवा काळापैसा एक गंभीर समस्या आहे या समस्येचे स्वरूप दिवसेंदिवस अधिक दृढ होत चालले आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक या सर्वच क्षेत्रावर काळा पैशांचा विपरित परिणाम होत आहे. एकंदरीत अर्थव्यवस्थेच्या विकासाला काळापैसा ह एक अडचण व गतिरोधक निर्माण झालेला आहे. केंद्र व राज्य सरकारने काळासाठी काळापैसा निर्मितीवर नियंत्रण मिळण्यासाठी कायदे निर्माण करून त्यांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी व दोषी असलेल्या व्यक्तीस त्यामध्ये शिक्षेची तरतूद करावी याशिवाय काळा पैशांचे निर्मितीला आळा बसणार नाही.

**संदर्भसूची**


१. दत्त सुंदरम,२००८,भारतीय अर्थव्यवस्था एस.चंद पब्लिकेशन,नवी दिल्ली.
२. जि.एन.झांमरे,२००४,भारतीय अर्थशास्त्र विकास व पर्यावरण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन,नागपुर
३. मधुसुदन साठे,२००८,नव्या जगाचे अर्थकारण डायमंड पब्लिकेशन, पुणे.
४. प्रभाकर कुलकर्णी,१९९२, भारतीय अर्थव्यस्था, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन,नागपुर.
५. एस एस जोशी,२०११ भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल डायमंड पब्लिकेशन,पुणे.
६. झुनझुनवाला,वाढत्या भ्रष्टाचारास आर्थिक नीती जबाबदार,लोकमत ७ नोव्हेंबर२००८.
७. रामदास गुजराथी,स्विस बँक आणि काळा पैसा,दैनिक लोकसत्ता ७ सप्टेंबर २००९
८. राजाराम कांबळे,स्वीस बँकेतील काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था,दैनिक पुढारी १ जानेवारी २०११
९. अर्थसंवाद
१०. योजना
१२. प्रतियोगिता दर्पण


□□□

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)